# इतिहास – राज्यशास्त्र

## इतिहास – राज्यशास्त्र : बोर्डाची कृतिपत्रिका (मार्च 2020)

**(आदर्श उत्तरांसह)**

**वेळ : 2.00 तास]** **[एकूण गुण : 40**

**सूचना :** *(1) सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

*(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे गुण दर्शवतात.*

*(3) प्रश्न/कृती **1** ते **5** इतिहासावर; तर प्रश्न/कृती **6** ते **9** राज्यशास्त्रावर विचारलेल्या आहेत.*

*(4) प्रश्न क्रमांक 1. (अ) व प्रश्न क्रमांक 6. मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.*

*(5) प्रश्न क्रमांक 2. (अ) आणि 8. (ब) मध्ये दिलेली संकल्पनाचित्रे कृतिपत्रिकेनुसारच पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.*

*(6) प्रश्न क्रमांक 1. (ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.*

*(7) प्रश्न क्रमांक 1. (अ), 1. (ब) व 6 या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास, प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.*

---

**प्र. 1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :** 3

(1) 'आधुनिक इतिहासलेखनाचा जनक' ------------------ यास म्हणता येईल.

*(अ) व्हॉल्टेअर (ब) रेने देकार्त (क) लिओपॉल्ड रांके (ड) कार्ल मार्क्स*

(2) विज्ञान आणि इतर सर्वच ज्ञानशाखांची --------------------- ही जननी मानली जाते.

*(अ) तत्त्वज्ञान (ब) इतिहास (क) नीतिशास्त्र (ड) मानववंशशास्त्र*

(3) महाबळेश्वरजवळील भिलार हे '------------- गाव' म्हणून प्रसिद्ध आहे.

*(अ) पुस्तकांचे (ब) वनस्पतींचे (क) आंब्यांचे (ड) किल्ल्यांचे*

**प्र. 1. (ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा :** 3

**(1)** (i) वि. का. राजवाडे – मराठ्यांच्या इतिहासाची साधने

(ii) स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर – द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स – 1857 (१८५७ चे स्वातंत्र्यसमर)

(iii) पंडिता रमाबाई – स्त्री-पुरुष तुलना

(iv) महात्मा फुले – गुलामगिरी

**(2)** (i) दर्पण – बाळशास्त्री जांभेकर

(ii) केसरी – बाळ गंगाधर टिळक

(iii) दीनबंधू – गोपाळ हरी देशमुख

(iv) प्रभाकर – भाऊ महाजन

(3) (i) लेणी — माथेरान, चिखलदरा


(ii) रेल्वे स्टेशन — छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई

(iii) अभयारण्य — दाजीपूर


(iv) नैसर्गिक वारसा — पश्चिम घाट व तेथील कास पठार

**प्र. 2. (अ) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा : *(कोणतीही दोन)*** **4**


**(1)**




**(2)**




**(3)**




**प्र. 2. (ब) थोडक्यात टिपा लिहा : *(कोणत्याही दोन)*** **4**

(1) भारतीय स्त्रीवादी इतिहासलेखन

(2) मनोरंजनाची आवश्यकता

(3) खेळांचे महत्त्व.

**प्र. 3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)*** **4**

(1) 'व्हॉल्टेअर हा आधुनिक इतिहासलेखनाचा जनक होता' असे म्हटले जाते.

(2) जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.

(3) कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

(4) अभिलेखागारे व ग्रंथालये नियतकालिके आणि इतर प्रकाशने प्रसिद्ध करतात.

**प्र. 4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून, त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **4**

**दशावतारी नाटके**

**दशावतारी नाटके :** 'दशावतारी नाटके' हा महाराष्ट्रातील लोकनाट्याचा एक प्रकार आहे. सुगीनंतर कोकण आणि गोवा येथे दशावतारी नाटकांचे प्रयोग होतात. दशावतारी नाटके मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध व कल्की या दहा अवतारांवर आधारित असतात. सर्वप्रथम सूत्रधार विघ्नहर्त्या गणपतीला आवाहन करतो.

दशावतारी नाटकातील पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेशभूषा ही परंपरागत असते. नाटकातील बहुतेक भाग पद्यमय असतो. काही संवाद पात्रे स्वयंस्फूर्तीने बोलतात. देवांसाठी लाकडी मुखवटे वापरतात. नाटकाचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे या कृतीने होतो.

१८व्या शतकात श्यामजी नाईक काळे यांनी दशावतारी खेळ दाखवणारा एक फड स्थापन केला होता. तो फड घेऊन ते महाराष्ट्रभर फिरत असत.

विष्णुदास भावे यांनी दशावतारी नाट्यतंत्राचे संस्करण करून आपली पौराणिक नाटके सादर केली. यामुळे मराठी नाटकांची पूर्वपीठिका दशावतारी नाटकांपर्यंत जाते.

**प्रश्न :**

(1) 'दशावतारी नाटके' हा कोणत्या राज्यातील लोकनाट्याचा प्रकार आहे? **(1)**

(2) दशावतारी नाटकाच्या सुरुवातीला सूत्रधार कोणाला आवाहन करतो? **(1)**

(3) दशावतारी नाटकांच्या सादरीकरणाचे स्वरूप स्पष्ट करा. **(2)**

**प्र. 5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(कोणतेही दोन)*** **6**

(1) मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय?

(2) लिखित साधनांचा अभ्यास करणाऱ्यांनी कोणते प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता असते?

(3) कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, ते स्पष्ट करा.

(4) वृत्तपत्रे सुरू होण्याआधीच्या काळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जगभर कोणते मार्ग अवलंबले जात असत?

**प्र. 6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा :** **2**

(1) लोकशाहीचा गाभा म्हणजे ---------------- होय.

*(अ) प्रौढ मताधिकार* *(ब) सत्तेचे विकेंद्रीकरण*

*(क) राखीव जागांचे धोरण* *(ड) न्यायालयीन निर्णय*

(2) शेतकरी चळवळीची --------- ही प्रमुख मागणी आहे.

*(अ) वनजमिनींवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा*

*(ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा*

*(क) ग्राहकांचे संरक्षण करावे*

*(ड) धरणे बांधावीत*

**प्र. 7. पुढील विधाने *चूक* की *बरोबर* ते सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)*** **4**

(1) भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

(2) राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

(3) डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व वाढत आहे.

**प्र. 8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा : *(कोणतीही एक)*** **2**


(1) माहितीचा अधिकार

(2) प्रादेशिकता.


**प्र. 8. (ब) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणतीही एक)*** **2**

- **पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा :**

**(1)**




**(2)**




**प्र. 9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : *(कोणताही एक)*** **2**

(1) 'निवडणूक आचारसंहिता' म्हणजे काय, हे स्पष्ट करा.

(2) स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री-चळवळी कोणत्या सुधारणांसाठी लढत होत्या?

# बोर्डाच्या कृतिपत्रिकेची उत्तरे (मार्च 2020)

**प्र. 1. (अ)**

(1) ‘आधुनिक इतिहासलेखनाचा जनक’ व्हॉल्टेअर यास म्हणता येईल.

(2) विज्ञान आणि इतर सर्वच ज्ञानशाखांची तत्त्वज्ञान ही जननी मानली जाते.

(3) महाबळेश्वरजवळील भिलार हे ‘पुस्तकांचे गाव’ म्हणून प्रसिद्ध आहे.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**


(1) पंडिता रमाबाई – स्त्री-पुरुष तुलना.

(2) दीनबंधू – गोपाळ हरी देशमुख.


(3) लेणी – माथेरान, चिखलदरा.

**प्र. 2. (अ)**


**(1)**




**(2)**




**(3)**



**प्र. 2. (ब)**

**(1) भारतीय स्त्रीवादी इतिहासलेखन :**

(१) स्वातंत्र्यपूर्व काळात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, डॉ. रखमाबाई अशा भारतीय स्त्रीवादी इतिहासलेखिका होऊन गेल्या. घरी आणि कामाच्या ठिकाणी स्त्रियांना मिळणारी अन्यायी वागणूक आणि स्त्री-पुरुष असमानता यांवर या लेखिकांनी लेखन केले.

(२) दलित स्त्रियांच्या दृष्टिकोनातून सामाजिक वर्ग, जात इत्यादी बाबींच्या संदर्भात स्त्रियांकडून लेखन केले गेले.

(३) स्वातंत्र्योत्तर काळात दलित स्त्रियांचे जीवन, सामाजिक वर्ग, जात इत्यादींवर शर्मिला रेगे यांनी लिहिलेल्या त्यांच्या लेखांचे संकलन 'रायटिंग कास्ट, रायटिंग जेंडर : रीडिंग दलित वुमेन्स टेस्टिमोनीज' या ग्रंथात केले आहे.

(४) मीरा कोसंबी या स्त्रीवादी लेखिकेने आपल्या 'क्रॉसिंग थ्रेशोल्डस् : फेमिनिस्ट एस्सेज इन सोशल हिस्टरी' या पुस्तकात महाराष्ट्रातील डॉ. रखमाबाई, पंडिता रमाबाई यांसारख्या स्त्रियांच्या जीवनावर निबंध लिहिले आहेत.

**(2) मनोरंजनाची आवश्यकता :**

(१) मनोरंजन हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. म्हणूनच प्रत्येक मानवाला मनोरंजनाची आवश्यकता असते. व्यक्तीच्या निकोप वाढीसाठी निखळ मनोरंजन महत्त्वाचे असते.

(२) चाकोरीबद्ध जगण्यातला कंटाळा दूर करून मनाला चैतन्य व उत्साह येण्यासाठी मनोरंजन आवश्यक असते.

(३) मनोरंजन मनाला उत्साह व कार्यशक्ती मिळवून देण्याचे काम करते. मनोरंजनातून छंद वाढीस लागतात व त्यातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

(४) मनोरंजनामुळे मनाला विरंगुळा मिळतो व मनावरील ताण हलके होतात.

**(3) खेळांचे महत्त्व :**

खेळांचे पुढील दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे –

(१) खेळांमुळे जीवनातील व्यथा व चिंता विसरल्या जातात. माणसाच्या मनाला विरंगुळा मिळतो, त्यामुळे मन ताजेतवाने व उल्हसित होते.

(२) खेळांमुळे व्यायाम होऊन शरीर काटक व बळकट होते.

(३) खेळांमुळे मनोधैर्य वाढते. चिकाटी, खिलाडूपणा हे गुण अंगी बाणतात.

(४) सांघिक खेळातून सहकार्य व संघभावना वाढीस लागते. खेळांमुळे नेतृत्वगुण विकसित होतात.

**प्र. 3.**

**(1)** व्हॉल्टेअरच्या मते, इतिहासलेखनासाठी–

(१) वस्तुनिष्ठ सत्य आणि घटनांचा कालक्रम योग्य असायला हवा.

(२) तत्कालीन समाजाच्या परंपरा, शेती, व्यापार व आर्थिक व्यवस्था यांचा विचारही होणे आवश्यक आहे.

(३) या त्याच्या मतामुळे इतिहासाची मांडणी करताना मानवी जीवनाचा सर्वांगीण विचार व्हायला हवा, हा नवीन विचार पुढे आला. म्हणून व्हॉल्टेअर याला 'आधुनिक इतिहासलेखनाचा जनक' असे म्हटले जाते.

**(2)** (१) पूर्वजांनी निर्माण केलेल्या कलाकृती, परंपरा हा आपला सांस्कृतिक वारसा असतो.

(२) त्याविषयी आपल्या मनात आपुलकी असते.

(३) हा वारसा पुढील मानवी पिढ्यांच्या हितासाठी जपणे व त्याचे संवर्धन होणे गरजेचे असते.

(४) काळाच्या ओघात हा ठेवा नामशेष होता कामा नये. त्याचे जतन कसे करावे, याच्या दिशादर्शक तत्त्वांच्या आधाराने जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे व परंपरा यांची यादी 'युनेस्को' या जागतिक संघटनेकडून जाहीर केली जाते.

**(3)** (१) कलावस्तूंच्या खरेदी-विक्रीचे एक स्वतंत्र क्षेत्र असते.

(२) कलावस्तू नकली आहेत की खऱ्या आहेत, त्यांतील धातू, लाकडाचा प्रकार, त्यांचा दर्जा योग्य आहे का हे त्यातील जाणकारच सांगू शकतो.

(३) कलावस्तूतील कलेचा दर्जा कसा आहे, हे कलाकारच ओळखू शकतात.

(४) एकूण, कलावस्तूंचे मूल्य ठरवताना वरील सर्व गोष्टींची पारख होणे आवश्यक असते; त्यासाठी कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

**(4)** (१) ग्रंथालये प्राचीन ग्रंथांचे जतन आणि संवर्धन करतात; तर जे दस्तऐवज प्रदर्शित केले जात नाहीत त्यांचे जतन अभिलेखागारांत केले जाते.

(२) हे दस्तऐवज हा आपला ऐतिहासिक ठेवा असून, तो लोकांपर्यंत पोहोचण्याची गरज असते.

(३) ग्रंथांच्या जतनाबरोबरच त्यांचे संशोधन करणे, ऐतिहासिक सत्याचा शोध लावणे ही कामेही ग्रंथालयांकडून केली जातात.

(४) इतिहासाची ही सर्व साधने लोकांच्या हाती देणे शक्य नसते. या ऐतिहासिक घटना, व्यक्तींची चरित्रे व इतिहासाच्या शोधांची शास्त्रशुद्ध माहिती लोकांपर्यंत पोहोचावी; म्हणून अभिलेखागारे व संग्रहालये नियतकालिके आणि अन्य प्रकाशने प्रसिद्ध करतात.

**प्र. 4.**

**(1)** दशावतारी नाटके हा महाराष्ट्रातील लोकनाट्याचा एक प्रकार आहे.

**(2)** दशावतारी नाटकाच्या सुरुवातीला सूत्रधार विघ्नहर्त्या गणपतीला आवाहन करतो.

**(3)** (१) दशावतारी नाटक हे विष्णूच्या दहा अवतारांवर आधारित असते. पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेशभूषा यांच्या साहाय्याने ही नाटके सादर केली जातात.

(२) देवांसाठी लाकडी मुखवटे वापरतात. नाटकाचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे या कृतीने होतो.

(३) नाटकातील बहुतेक भाग पद्यमय असून, काही संवाद पात्रे स्वयंस्फूर्तीने बोलतात.

(४) महाराष्ट्रातील लोकनाट्याचाच हा एक प्रकार आहे. शेतीत पीकपाणी आल्यावर सुगीच्या दिवसांत कोकण व गोवा येथे दशावतारी नाटकांचे प्रयोग गावोगावी केले जातात.

प्र. 5.

**(1)** स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय इतिहासलेखनात जे नवे वैचारिक प्रवाह आढळून येतात; त्यात 'मार्क्सवादी इतिहासलेखन' हा एक प्रमुख प्रवाह आहे.

(१) मार्क्सवादात वर्गसंघर्षावर भर दिलेला आहे. मार्क्सच्या विचारांवर आधारित जे इतिहासलेखन केले गेले, त्याला 'मार्क्सवादी इतिहासलेखन' असे म्हणतात.

(२) मार्क्सवादी इतिहासलेखनात आर्थिक व्यवस्थेतील उत्पादनाची साधने, पद्धती आणि उत्पादनाच्या प्रक्रियेतील मानवी संबंध यांचा प्रामुख्याने विचार केलेला आहे.

(३) प्रत्येक सामाजिक घटनेचा सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम होतो, याचे विश्लेषण करणे, हे मार्क्सवादी इतिहासलेखनाचे मुख्य सूत्र आहे.

(४) मार्क्सवादी इतिहासकारांनी जातिव्यवस्थेत होत गेलेल्या बदलांचा अभ्यास केला. भारतातही या पद्धतीचा अवलंब कोसंबी, डांगे, शरद पाटील इत्यादींनी आपल्या इतिहासलेखनात प्रभावीपणे केलेला दिसून येतो.

**(2)** इतिहासाच्या अभ्यासकाला लिखित साधनांचा अभ्यास करावाच लागतो. ही साधने हाताळताना त्याला पुढील प्रशिक्षणाची आवश्यकता असते—

(१) त्याला ब्राह्मी, मोडी, पर्शियन यांसारख्या प्राचीन लिप्या आणि त्यांचा विकासक्रम यांचे ज्ञान हवे.

(२) तो ज्या काळातील घटनांचा अभ्यास करीत आहे, त्या इतिहासकाळातील समाजरचना व परंपरा त्याने माहीत करून घेतल्या पाहिजेत.

(३) त्या काळातील साहित्य, लिहिण्याच्या पद्धती यांची ओळख असावी. तत्कालीन संस्कृती, शासनव्यवस्था, राजसत्ता यांचे त्याला प्राथमिक ज्ञान असावे.

(४) तत्कालीन चित्रशैली, शिल्पकलाशैली आणि त्यांचा विकासक्रम यांचा त्याने अभ्यास केला पाहिजे.

(५) जे प्राचीन दस्तऐवज तो हाताळणार आहे, त्या कागदाचा प्रकार, शाई व रंग, भूर्जपत्रे इत्यादींबाबत त्याला माहिती असावी.

(६) कोरीव लेखांसाठी वापरलेला दगड, धातू यांच्या स्वरूपाविषयीची माहिती त्याने अवगत केलेली असावी.

(७) त्याच्या अभ्यासविषयासंबंधी यापूर्वी झालेले संशोधनपर लेखन त्याने वाचलेले असावे.

**(3)** विविध कलाक्षेत्रांत व्यवसायाच्या पुढील संधी उपलब्ध असतात—

(१) कलेच्या अभ्यासकांना संग्रहालये, अभिलेखागारे, ग्रंथालये, पुरातत्त्वीय संशोधन आणि भारतीय विद्या या ठिकाणी व्यवसाय मिळू शकतात.

(२) कलांचे अभ्यासक पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करू शकतात.

(३) औद्योगिक आणि जाहिरात क्षेत्रात तसेच कलावस्तूंच्या खरेदी-विक्री व्यवसायात कलांच्या जाणकारांची आवश्यकता असते.

(४) चित्रपट आणि नाटक निर्मितीसाठी नेपथ्य, कलाकार, दिग्दर्शक, छायाचित्रकार, प्रकाशयोजनाकार इत्यादी कलाकारांची आवश्यकता असते.

(५) मुद्रणक्षेत्रात तसेच घरसजावटीच्या साहित्यनिर्मितीत कलाक्षेत्रातील जाणकारांची गरज असते.

(६) दागदागिने, धातूंच्या वा लाकडी शोभेच्या वस्तू बनवणे, बांबू, काच, कापड, माती वा दगडी कलापूर्ण वस्तू, शिल्पे बनवणे या क्षेत्रांतही व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध असतात.

**(4)** वृत्तपत्रे सुरू होण्याआधीच्या काळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जगभर पुढील मार्ग अवलंबले जात असत –

(१) इजिप्तमध्ये सरकारी आदेशांचे कोरीव लेख सार्वजनिक ठिकाणी लावून ठेवले जात असत.

(२) प्राचीन रोमन साम्राज्यात देशातील महत्त्वाच्या घटना, सरकारी हुकूम कागदावर लिहून ते कागद प्रांतोप्रांती वाटत असत.

(३) ज्युलियस सीझरच्या काळी 'ॲक्टा डायर्ना (रोजच्या घटना)' नावाची वार्तापत्रे रोममध्ये सार्वजनिक ठिकाणी लावत असत.

(४) चीनमध्ये सातव्या शतकात सरकारी निवेदने सार्वजनिक ठिकाणी लावली जात असत.

(५) इंग्लंडमधील लढायांची किंवा महत्त्वाच्या घटनांची पत्रके प्रवासी, फिरस्ते व अन्य लोकांना वाटत असत.

(६) अनेक राज्यांत राजांचे राज्यभरातील प्रतिनिधी राजांचे आदेश जनतेपर्यंत व राज्यातील महत्त्वाच्या बातम्या राजांपर्यंत पोहोचवत असत.

**प्र. 6.**

(1) लोकशाहीचा गाभा म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण होय.

(2) शेतकरी चळवळीची शेतीमालाला योग्य भाव मिळावा ही प्रमुख मागणी आहे.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान बरोबर आहे; कारण–

(१) भारतीय संविधानाने स्वातंत्र्यपूर्व काळातील मतदानाच्या अधिकारासाठी असणारी सर्व बंधने रद्द केल्यामुळे मतदारांची संख्या वाढली आहे.

(२) संविधानाने स्वीकारलेल्या प्रौढ मताधिकाराच्या तरतुदीमुळे सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

(३) सुरुवातीस मताधिकारासाठी असणारी २१ वर्षांची अट नंतर १८ वर्षे पूर्ण अशी केल्यामुळे, मताधिकार अधिक व्यापक झाला. मतदारांची एवढी संख्या जगातील कोणत्याच लोकशाही देशात नाही; म्हणून भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

**(2)** हे विधान बरोबर आहे; कारण–

(१) राजकीय पक्ष जनतेच्या मागण्या आणि गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहोचवण्याचे कार्य करतात.

(२) शासन पक्षांमार्फत आपल्या धोरणांची, योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचा या कार्यक्रमांना पाठिंबा मिळवतात.

(३) या धोरणांवरील जनतेच्या प्रतिक्रिया सरकारला सांगण्याचे कामही राजकीय पक्षच करतात.

अशा रितीने राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

**(3)** हे विधान चूक आहे; कारण –

(१) जमीनदारांनी शेतकरी आणि आदिवासी यांच्या जमिनी बळकावल्या.

(२) यामुळे हा अन्याय दूर करून भूमिहीनांना जमिनी परत मिळवून देण्यासाठी नक्षलवादी, म्हणजेच डाव्या उग्रवाद्यांची चळवळ सुरू झाली.

(३) परंतु, मूळ उद्देश बाजूला पडून ही चळवळ सरकारविरोधात हिंसक कारवाया करू लागली. पोलिसांवर हल्ले करू लागली. हिंसेलाच अधिक महत्त्व आले.

म्हणून डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व कमी झाले आहे.

**प्र. 8. (अ)**

**(1) माहितीचा अधिकार :**

(१) शासनाने केलेल्या व्यवहारांची माहिती जनतेला मिळावी, शासन आणि जनता यांच्यात सुसंवाद साधला जाऊन, परस्परांविषयी विश्वास वाढावा यासाठी २००५ साली शासनाने नागरिकांना माहितीचा अधिकार दिला.

(२) या अधिकारामुळे गोपनीयतेच्या नावाखाली शासकीय कारभारातील गैरप्रकार दडपले जाऊ शकत नाहीत.

(३) शासनाचा कारभार पारदर्शी होण्यास आणि आपण जनतेला उत्तरदायी आहोत, याची जाणीव या अधिकारामुळे शासनाला होते.

(४) माहितीच्या अधिकारामुळे लोकशाही आणि नागरिकांचे अधिकार यांचे सक्षमीकरण झाले. शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी होऊन शासनाचे व्यवहार खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली आहे.

**(2) प्रादेशिकता :**

(१) भारतात विविध भाषा बोलणारे, विविध परंपरा आणि संस्कृती असणारे लोक राहतात.


(२) भौगोलिक विविधतेबरोबरच साहित्य, शिक्षण, इतिहास, चळवळी यांबाबतीतही भारतात विविधता आढळते.

(३) प्रत्येकालाच आपली भाषा, परंपरा, संस्कृती यांच्याविषयी आत्मीयता वाटते. या आत्मीयतेतूनच वरील सर्वांबाबत अस्मिता निर्माण होते.


(४) आपल्या भाषेच्या, प्रदेशाच्या विकासाला लोक प्राधान्य देऊ लागतात, यालाच 'प्रादेशिकता' असे म्हणतात.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**



**प्र. 9.**

**(1)** (१) निवडणुका जाहीर झाल्यापासून निर्णय घोषित होईपर्यंत सरकार, राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे व कोणते वर्तन करू नये, यासंबंधीची जी नियमावली निवडणूक आयोगाकडून जाहीर केली जाते, त्या आचारनियमावलीस 'निवडणूक आचारसंहिता' असे म्हणतात.

(२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होऊ नयेत, म्हणून आचारसंहिता घोषित केली जाते. आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईमुळे सामान्य मतदार आश्वस्त होतो व निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पद्धतीने घेता येतात.

**(2)** स्वातंत्र्यपूर्व काळात पुढील सुधारणांसाठी स्त्री-चळवळी लढत होत्या –

(१) स्त्रियांवरील होणारा अन्याय दूर व्हावा.

(२) स्त्रियांचे शोषण थांबवावे.

(३) सार्वजनिक जीवनात स्त्रियांना सन्मानाने जगता यावे.

(४) सतीप्रथा, विधवांची उपेक्षा, बहुपत्नी विवाहपद्धती, बालविवाह प्रथा इत्यादी सामाजिक प्रथा नष्ट व्हाव्यात.

---

# इतिहास – राज्यशास्त्र : बोर्डाची कृतिपत्रिका (नोव्हेंबर 2020)

## (आदर्श उत्तरांसह)

**वेळ : 2.00 तास]** **[एकूण गुण : 40**

**सूचना :** *(1) सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

*(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे गुण दर्शवतात.*

*(3) प्रश्न/कृती **1** ते **5** इतिहासावर; तर प्रश्न/कृती **6** ते **9** राज्यशास्त्रावर विचारलेल्या आहेत.*

*(4) प्रश्न क्रमांक 1. (अ) व प्रश्न क्रमांक 6. मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.*

*(5) प्रश्न क्रमांक 2. (अ) आणि 8. (ब) मध्ये दिलेली संकल्पनाचित्रे कृतिपत्रिकेनुसारच पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.*

*(6) प्रश्न क्रमांक 1. (ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.*

*(7) प्रश्न क्रमांक 1. (अ), 1. (ब) व 6 या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास, प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.*

---

**प्र. 1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :** **3**

(1) 'आधुनिक इतिहासलेखनाचा जनक' .................. यास म्हणता येईल.

*(अ) व्हॉल्टेअर (ब) रेने देकार्त (क) लिओपॉल्ड रांके (ड) कार्ल मार्क्स*

(2) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार .................. येथे आहे.

*(अ) मुंबई (ब) चेन्नई (क) दिल्ली (ड) कोलकाता*

(3) थॉमस कुकने .................. विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.

*(अ) हस्तकौशल्याच्या वस्तू (ब) खेळणी (क) खाद्यवस्तू (ड) पर्यटन तिकिटे*

**प्र. 1. (ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा :** **3**

**(1)** (i) हू वेअर द शूद्राज – वंचितांचा इतिहास

(ii) स्त्री-पुरुष तुलना – स्त्रीवादी लेखन

(iii) द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स – 1857 – मार्क्सवादी इतिहास

(iv) ग्रँट डफ – वसाहतवादी इतिहास

**(2)** (i) दर्पण – बाळशास्त्री जांभेकर

(ii) प्रभाकर – आचार्य प्र. के. अत्रे

(iii) दीनबंधू – कृष्णराव जांभेकर

(iv) केसरी – बाळ गंगाधर टिळक

**(3)** (i) ऐतिहासिक पर्यटन – ऐतिहासिक वारसा स्मारक स्थळांना भेटी


(ii) नैमित्तिक पर्यटन – फिल्म फेस्टिव्हल, पुस्तक प्रदर्शनाला भेटी

(iii) आंतरराष्ट्रीय पर्यटन – थंड हवेच्या ठिकाणांना भेटी


(iv) क्रीडा पर्यटन – क्रीडासामने पाहण्यास जाणे

प्र. 2. (अ) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा : *(कोणतीही दोन)* 4


(1)




(2)




(3)




प्र. 2. (ब) थोडक्यात टिपा लिहा : *(कोणत्याही दोन)* 4

(1) ॲनल्स प्रणाली

(2) खेळ व चित्रपट

(3) दशावतारी नाटके.

प्र. 3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)* 4

(1) मायकेल फुको यांच्या लेखनपद्धतीला 'ज्ञानाचे पुरातत्त्व' म्हटले जाते.

(2) इतिहासाची संशोधनपद्धती अनेक विषयांच्या संशोधनात उपयुक्त ठरते.

(3) चित्रकथीसारख्या नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

(4) विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

**प्र. 4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून, त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **4**

> **तमाशा :** 'तमाशा' हा शब्द मुळात पर्शियन भाषेतील आहे. चित्ताला प्रसन्नता देणारे दृश्य, असा याचा अर्थ आहे. विविध लोककला आणि अभिजात कलांचे प्रवाह सामावून घेत अठराव्या शतकापर्यंत तमाशा विकसित झाला. पारंपरिक तमाशाचे दोन प्रकार आहेत – संगीत बारी आणि ढोलकीचा फड. संगीत बारीमध्ये नाट्यापेक्षा नृत्य आणि संगीतावर अधिक भर असतो. प्राधान्याने नृत्य-संगीताचा समावेश असलेल्या तमाशात कालांतराने 'वग' या नाट्यरूपाचा समावेश केला गेला. उत्स्फूर्त विनोदाच्या आधाराने वग रंगत जातो. तमाशाच्या सुरुवातीला 'गण' म्हणजे गणेशवंदना गायली जाते. त्यानंतर 'गवळण' सादर केली जाते. तमाशाच्या दुसऱ्या भागात मुख्य नाटक म्हणजे 'वग' सादर केला जातो. 'विच्छा माझी पुरी करा' आणि 'गाढवाचे लग्न' यांसारखे मराठी रंगभूमीवर गाजलेले प्रयोग हे तमाशाचे आधुनिक स्वरूप दर्शवतात.

**प्रश्न :**

(1) 'तमाशा' हा शब्द कोणत्या भाषेतील आहे? **(1)**

(2) पारंपरिक तमाशाचे दोन प्रकार कोणते? **(1)**

(3) तमाशाच्या सादरीकरणाचे आधुनिक स्वरूप स्पष्ट करा. **(2)**

**प्र. 5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(कोणतेही दोन)*** **6**

(1) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहासलेखनातील योगदान स्पष्ट करा.

(2) अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्त्वाची आहेत?

(3) कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत? स्पष्ट करा.

(4) नियतकालिकाची व्याख्या, प्रकार व स्वरूप यांविषयी सविस्तर माहिती लिहा.

**प्र. 6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा :** **2**

(1) भारतीय संविधानात बदल करण्याचा अधिकार --------------- आहे.

*(अ) संसदेला* *(ब) स्थानिक शासन संस्थांना*

*(क) विधिमंडळाला* *(ड) सहकारी संस्थेला*

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी --------- करण्यात आली.

*(अ) जलक्रांती* *(ब) हरितक्रांती*

*(क) औद्योगिकक्रांती* *(ड) धवलक्रांती*

**प्र. 7. पुढील विधाने चूक की *बरोबर* ते सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)*** **4**

(1) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

(2) 'शिरोमणी अकाली दल' हा राष्ट्रीय पक्ष आहे.

(3) लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते.

**प्र. 8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा : *(कोणतीही एक)*** **2**


(1) मताधिकार

(2) निवडणूक आयोग.


**प्र. 8. (ब) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणतीही एक)*** **2**

● **पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा :**

**(1)**




**(2)**




**प्र. 9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : *(कोणतेही एक)*** **2**

(1) 'निवडणूक आचारसंहिता' म्हणजे काय, हे स्पष्ट करा.

(2) आजच्या कामगार चळवळीसमोर कोणत्या समस्या आहेत?

# बोर्डाच्या कृतिपत्रिकेची उत्तरे (नोव्हेंबर 2020)

**प्र. 1. (अ)**

(1) 'आधुनिक इतिहासलेखनाचा जनक' व्हॉल्टेअर यास म्हणता येईल.

(2) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार दिल्ली येथे आहे.

(3) थॉमस कुकने पर्यटन तिकिटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**


(1) द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स – 1857 – मार्क्सवादी इतिहास.

(2) प्रभाकर – आचार्य प्र. के. अत्रे.


(3) आंतरराष्ट्रीय पर्यटन – थंड हवेच्या ठिकाणांना भेटी.

**प्र. 2. (अ)**


**(1)**




**(2)**



(3)




**प्र. 2. (ब)**

**(1) ॲनल्स प्रणाली :**

(१) राजकीय अभ्यासाबरोबरच स्थानिक लोक, तत्कालीन हवामान, व्यापार, शेती, तंत्रज्ञान, दळणवळण व संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांचाही अभ्यास करणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. या विचारप्रणालीलाच 'ॲनल्स प्रणाली' असे म्हणतात.

(२) 'ॲनल्स' (Annals) म्हणजे वार्षिक इतिवृत्त. घटना ज्या काळात घडली तिचा केवळ राजकीय नव्हे; तर तत्कालीन सामाजिक, आर्थिक इत्यादी सर्वांगांनी अभ्यास केला पाहिजे; असे मानणारी 'ॲनल्स प्रणाली' फ्रेंच इतिहासकारांनी विसाव्या शतकात प्रथम विकसित केली. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनास एक निराळीच दिशा प्राप्त झाली.

**(2) खेळ व चित्रपट :**

(१) पूर्वीच्या चित्रपटांमधून नायक-नायिका खेळ खेळत असल्याची किंवा खेळांची दृश्ये दाखवली जात असत.

(२) अलीकडच्या काळात खेळ आणि खेळाडूंचा जीवनपट दाखवणारे हिंदी-इंग्रजी चित्रपट निघाले आहेत. 'लगान', 'दंगल' असे क्रिकेट, कुस्ती अशा खेळांशी संबंधित चित्रपट निघाले आहेत.

(३) मेरी कोम, फोगट भगिनी या खेळाडूंच्या जीवनावर चित्रपट निघाले आहेत.

(४) प्रसिद्ध धावपटू मिल्खा सिंग, क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर आणि क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी यांच्या कारकिर्दींवरही चित्रपट निघाले आहेत. एकूण खेळ व चित्रपट यांचा संबंध मूकपटापासून आजपर्यंत घनिष्ठ राहिलेला आहे.

**(3) दशावतारी नाटके :**

शेतीत पीकपाणी आल्यावर सुगीच्या दिवसांत कोकण व गोवा येथे दशावतारी नाटकांचे प्रयोग गावोगावी केले जातात. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे असते—

(१) दशावतारी नाटक हे विष्णूच्या दहा अवतारांवर आधारित असते. पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेशभूषा यांच्या साहाय्याने ही नाटके सादर केली जातात.

(२) देवांसाठी लाकडी मुखवटे वापरतात. नाटकाची सुरुवात विघ्नहर्त्या गणपतीच्या आवाहनाने होते. नाटकाचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे या कृतींनी होतो.

(३) नाटकातील बहुतेक भाग पद्यमय असून, काही संवाद पात्रे स्वयंस्फूर्तीने बोलतात.

(४) दशावतारी नाटके हा महाराष्ट्रातील लोकनाट्याचाच एक प्रकार आहे.

**प्र. 3.**

**(1)** (१) मायकेल फुको यांनी कालक्रमानुसार इतिहासाची अखंड मांडणी करण्याची पद्धती चुकीची ठरवली.

(२) त्यांच्या मते, अंतिम सत्यापर्यंत पोहोचणे, हे पुरातत्त्वाचे उद्दिष्ट नसते.

(३) भूतकाळातील स्थित्यंतरांचे, म्हणजेच बदलांचे स्पष्टीकरण देण्याचा पुरातत्त्वाचा प्रयत्न असतो.

(४) फुको यांनी इतिहासातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्यावर अधिक भर दिला; म्हणून त्यांच्या लेखनपद्धतीला 'ज्ञानाचे पुरातत्त्व' असे म्हटले आहे.

**(2)** (१) इतिहास हा भूतकाळात घडून गेलेल्या घटनांशी संबंधित असतो.

(२) वर्तमानात दिसणाऱ्या मानवी जीवनाची घडण ही भूतकाळातील त्या घटनांवरच आधारलेली असते.

(३) या घटना विज्ञान-तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक-धार्मिक-राजकीय संघटन, कला इत्यादी क्षेत्रांमध्ये घडलेल्या असतात.

(४) या प्रत्येक क्षेत्रातील ज्ञानसाठ्याचा स्वतंत्र इतिहास असतो आणि या ज्ञानसाठ्याच्या आधारेच त्या प्रत्येक क्षेत्रातील पुढील वाटचालीची दिशा चालू असते.

म्हणूनच, प्रत्येक क्षेत्रातील इतिहासाचे हे महत्त्व लक्षात घेता, इतिहासाची संशोधन पद्धती अनेक विषयांच्या संशोधनात उपयुक्त ठरते.

**(3)** (१) कठपुतळ्या किंवा चित्रांच्या साहाय्याने रामायण-महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे 'चित्रकथी परंपरा' होय.

(२) या परंपरा आपल्या संस्कृतीच्या घटक असून, तो आपला वैभवशाली वारसा आहे.

(३) ठाकर, आदिवासी, वारली अशा जमातींनी चित्रकथी परंपरा पिढ्यान्पिढ्या टिकवून ठेवली आहे.

(४) चित्रकथी कुटुंबांमध्ये जतन करून ठेवलेल्या पोथ्या आता जीर्ण झाल्या आहेत.

म्हणून, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या चित्रकथीसारख्या या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

**(4)** (१) इतिहास संशोधन करताना इतिहासाची साधने मिळवणे, मिळालेल्या साधनांच्या नोंदी करून त्यांची सूची तयार करणे ही कामे करावी लागतात.

(२) जुने ग्रंथ, हस्तलिखिते, पुरावस्तू यांची काळजीपूर्वक साफसफाई करून त्या जतन करून ठेवणे, त्या प्रदर्शित करणे ही जबाबदारीची कामे करावी लागतात.

(३) इतिहासाच्या या साधनांचे जतन आणि हाताळणी करणे हे कौशल्याचे काम असते.

(४) या सर्व कृती करताना कोणती कौशल्ये आत्मसात करायची, कोणती सावधानता बाळगायची हे माहीत असले पाहिजे.

म्हणूनच, विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

**प्र. 4.**

**(1)** 'तमाशा' हा शब्द मूळ पर्शियन भाषेतील आहे.

**(2)** पारंपरिक तमाशाचे 'संगीत बारी' आणि 'ढोलकीचा फड' असे दोन प्रकार आहेत.

**(3)** (१) पर्शियन भाषेतून मराठीत आलेल्या 'तमाशा' या शब्दाचा अर्थ 'चित्ताला प्रसन्नता देणारे दृश्य' असा होतो.

(२) लोककला आणि अभिजात कलाप्रकारांच्या मिश्रणातून तयार झालेला हा मनोरंजनाचा कलाप्रकार अठराव्या शतकात महाराष्ट्रात चांगलाच लोकप्रिय झाला.

(३) तमाशाचे 'संगीत बारी' आणि 'ढोलकीचा फड' असे दोन परंपरागत प्रकार आहेत. संगीत बारीत लावण्या व संगीत यांच्या तालावर नृत्य केले जाते. ढोलकीचा फड या प्रकारात गण म्हणजेच गणेशवंदन, गवळण, बतावणी व नंतर वग म्हणजेच वगनाट्य सादर केले जाते.

(४) 'विच्छा माझी पुरी करा' किंवा 'गाढवाचं लग्न' अशी आधुनिक स्वरूपात रंगमंचावर आलेली वगनाट्ये खूप गाजली.

**प्र. 5.**

**(1)** भाषाशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र आणि इतिहासलेखन यांत मूलभूत संशोधन करणाऱ्या वि. का. राजवाडे यांचे इतिहासलेखनातील योगदान पुढीलप्रमाणे–

(१) राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असे शीर्षक असणारे २२ खंड संपादित केले.

(२) इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय, हा विचार मांडला.

(३) केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी केलेली कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती म्हणजे इतिहास नव्हे, असे त्यांचे मत होते.

(४) आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे, हा विचार त्यांनी भारतीय इतिहासकारांना दिला.

(५) अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला गेला पाहिजे, याबाबत ते आग्रही होते.

(६) स्थळ, काळ व व्यक्ती या त्रयींनी बद्ध झालेल्या मानवी प्रसंगांचे वर्णन इतिहासलेखनात असायला हवे, असे त्यांचे मत होते.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी केलेले ऐतिहासिक लेखन व मांडलेली मते हे इतिहासलेखनाला दिलेले मोठे योगदान आहे.

**(2)** अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात पुढील कामे महत्त्वाची असतात–

(१) महत्त्वाच्या नोंदी असलेली कागदपत्रे, त्यांत कोणताही बदल न करता सुरक्षित ठेवणे. महत्त्वाच्या कागदपत्रांची गोपनीयता जपणे.

(२) कागदपत्रांचे वर्गीकरण करून सूची तयार करणे.

(३) जुन्या कागदपत्रांचे वाळवी, दमट हवा इत्यादींपासून संरक्षण करणे. राष्ट्राचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवणे.

(४) अभिलेख व्यवस्थापनाविषयी सुधारित कार्यपद्धती अमलात आणणे. संगणकीय प्रणालीचा वापर करणे.

(५) विभागीय आणि स्थानिक अभिलेखागारे स्थापन करणे.

(६) अभिलेखागाराची दैनंदिन कामे सुकर होण्याच्या दृष्टीने यंत्रणा निर्माण करणे. कागदपत्रे मागणीनुसार शासनाला व नागरिकांना उपलब्ध करून देणे. महत्त्वाच्या बाबी लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी नियतकालिके व अन्य प्रकाशने प्रसिद्ध करणे.

**(3)** विविध कलाक्षेत्रांत व्यवसायाच्या पुढील संधी उपलब्ध असतात–

(१) कलेच्या अभ्यासकांना संग्रहालये, अभिलेखागारे, ग्रंथालये, पुरातत्त्वीय संशोधन, पत्रकारिता आणि भारतीय विद्या या ठिकाणी व्यवसाय मिळू शकतात.

(२) औद्योगिक आणि जाहिरात क्षेत्रात तसेच कलावस्तूंच्या खरेदी-विक्री व्यवसायात कलांच्या जाणकारांची आवश्यकता असते.

(३) चित्रपट आणि नाटक निर्मितीसाठी नेपथ्य, कलाकार, दिग्दर्शक, छायाचित्रकार, प्रकाशयोजना इत्यादी कलाकारांची आवश्यकता असते.

(४) मुद्रणक्षेत्रात तसेच घरसजावटीच्या साहित्यनिर्मितीत कलाक्षेत्रातील जाणकारांची गरज असते.

(५) दागदागिने, धातूंच्या वा लाकडी शोभेच्या वस्तू बनवणे या क्षेत्रांत अनेक व्यावसायिक संधी आहेत.

(६) बांबू, काच, कापड, माती वा दगडी कलापूर्ण वस्तू, शिल्पे बनवणे या क्षेत्रांतही व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध असतात.

**(4)** नियतकालिकांची व्याख्या, प्रकार व स्वरूप :

**(अ) व्याख्या :** (१) ठरावीक कालावधीत प्रकाशित होणारे मुद्रित साहित्य, म्हणजे 'नियतकालिक' होय.

(२) एकाच शीर्षकाखाली किमान एक आठवडा किंवा त्याहून अधिक कालावधीनंतर सामान्यत: नियमितपणे प्रसिद्ध होणारे मुद्रित साहित्य, म्हणजे 'नियतकालिक' होय.

**(ब) प्रकार :** (१) प्रकाशनाच्या कालावधीवरून नियतकालिकांचे साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, षण्मासिक व वार्षिक असे प्रकार पडतात.

(२) याखेरीज काही प्रासंगिक कारणांसाठीही नियतकालिके काढली जातात, त्यांना 'अनियतकालिके' असे म्हणतात.

**(क) नियतकालिकांचे स्वरूप :** (१) काही नियतकालिके संशोधनाला किंवा विशिष्ट विचारसरणीला बांधलेली असतात.

(२) काही नियतकालिके अर्थ, आरोग्य, कृषी, शिक्षण, उद्योग, धर्म अशा विशिष्ट विषयांना वाहिलेली असतात.

(३) सिनेसृष्टी, खेळ, साहित्य आणि मनोरंजन यांना प्राधान्य देणारीही नियतकालिके असतात.

(४) भारतीय इतिहास व संस्कृती, मराठवाडा इतिहास परिषद पत्रिका अशी इतिहासाशी संबंधित नियतकालिकेही प्रकाशित होत असतात. नियतकालिके ही इतिहासाच्या अभ्यासाची महत्त्वपूर्ण साधने आहेत.

**प्र. 6.**

(1) भारतीय संविधानात बदल करण्याचा अधिकार <u>संसदेला</u> आहे.

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी <u>हरितक्रांती</u> करण्यात आली.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान <u>बरोबर</u> आहे; कारण–

(१) संविधान हे लिखित स्वरूपात असले, तरी ते ग्रंथात बंद झालेले नसून ते प्रवाही असते.

(२) संविधानात बदलत्या परिस्थितीनुसार बदल करण्याचा अधिकार संसदेला असतो.

(३) संविधानाच्या मूलभूत चौकटीला धक्का न लावता जनतेच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी संसद असे बदल करू शकते. संविधानाच्या या प्रवाही गुणधर्मामुळेच त्याचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

**(2)** हे विधान चूक आहे; कारण—

(१) भारतीय निवडणूक आयोग हा राजकीय पक्षांच्या मान्यतेचे निकष निश्चित करून, राष्ट्रीय वा प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देत असतो.

(२) संसद आणि विधिमंडळात मिळवलेल्या जागा आणि निवडणुकीत मिळालेल्या मतांची टक्केवारी यांचा या अटीत समावेश असतो.

(३) शिरोमणी अकाली दल हा 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून निश्चित केलेल्या अटीत बसत नाही. तो पंजाब राज्यापुरता मर्यादित व प्रभावी असल्याने या पक्षाला राष्ट्रीय नव्हे; तर प्रादेशिक पक्ष म्हणून आयोगाने मान्यता दिलेली आहे.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) लोकशाही व्यवस्था केवळ शासकीय पातळीवर असून चालत नाही; तर ती लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे.

(२) लोकशाहीतील लोकांचे हक्क, स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सतत जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

(३) भ्रष्टाचार, हिंसा, गुन्हेगारीकरण यांसारख्या लोकशाहीला आव्हान देणाऱ्या समस्या वेळीच नष्ट कराव्या लागतात. त्यासाठी लोकांना आणि शासनालाही सतत दक्ष राहावे लागते.

## प्र. 8. (अ)

**(1) मताधिकार :**

(१) भारतीय संविधानाने प्रौढ मताधिकार पद्धतीचा स्वीकार केला आहे.

(२) सुरुवातीस सर्व स्त्री-पुरुषांना मतदानासाठीची असलेली २१ वर्षे पूर्ण ही पात्रताअट नंतर १८ वर्षे पूर्ण अशी केली गेली.

(३) मतदानासाठीची वयाची पात्रताअट कमी केल्यामुळे मोठ्या प्रमाणात युवा वर्ग मतदानाच्या अधिकारात सामील झाला आहे.

(४) लोकशाहीची व्याप्ती वाढवणाऱ्या या अधिकारामुळे भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही बनली आहे.

**(2) निवडणूक आयोग :**

(१) लोकशाहीच्या यशस्वितेसाठी ठरावीक कालावधीत निवडणुकांची गरज असते. या निवडणुका खुल्या वातावरणात घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी.


(२) या विचाराने संविधानाने कलम ३२४ अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली. या यंत्रणेत एक मुख्य आयुक्त व अन्य दोन निवडणूक आयुक्त असून त्यांची राष्ट्रपतींकडून नेमणूक होते.

(३) या तीनही आयुक्तांचा दर्जा व अधिकार समान असतात. निवडणुकीच्या तारखा निश्चित करण्यापासून ते निवडणुकांचे निकाल जाहीर करण्यापर्यंत निवडणुकीची सर्व प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली चालते.


(४) निवडणूक आयोगाकडे स्वत:चा स्वतंत्र कर्मचारीवर्ग नसतो. शासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांच्या मदतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. आयोगाच्या खर्चासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद केलेली असते. निवडणूक आयोगाला स्वायत्तता असते.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**




**प्र. 9.**

**(1)** (१) निवडणुका जाहीर झाल्यापासून निर्णय घोषित होईपर्यंत सरकार, राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे व कोणते वर्तन करू नये, यासंबंधीची जी नियमावली निवडणूक आयोगाकडून जाहीर केली जाते, त्या आचारनियमावलीस 'निवडणूक आचारसंहिता' असे म्हणतात.

(२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होऊ नयेत, म्हणून आचारसंहिता घोषित केली जाते. आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईमुळे सामान्य मतदार आश्वस्त होतो; तसेच निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पद्धतीने घेता येतात.

**(2)** काही मूलभूत प्रश्न सोडवले जावेत, या कामगार चळवळीच्या प्रमुख मागण्या आहेत आणि त्यांच्या समस्याही आहेत –

(१) कंत्राटी कामगार पद्धती व अस्थिर रोजगार.

(२) आर्थिक असुरक्षितता व कामाच्या ठिकाणी असणारी असुरक्षितता.

(३) कामाचे अमर्याद तास आणि अनारोग्य.

(४) कामगार कायद्यांचे संरक्षण नसणे.

❊ ❊ ❊